पुढारी

# विद्यार्थ्यांची प्रवेशासाठी महाविद्यालयात गर्दी

## शिवाजी विद्यापीठाच्या परिपत्रकाकडे दुर्लक्ष

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

प्रथम वर्ष प्रवेशाची ऑनलाईन प्रक्रिया राबविण्यासंदर्भात शिवाजी विद्यापीठाच्या संलग्नता विभागाने सर्व संलग्नित महाविद्यालयांना परिपत्रक काढले आहे, तरीही काही महाविद्यालयांकडून विद्यार्थ्यांना ऑनलाईन रजिस्ट्रेशन व प्रवेशासाठी महाविद्यालयात बोलविले जात आहे. त्यामुळे गर्दी होत असून कोरोनाचा संसर्ग वाढण्याची भीती आहे.



बारावीचे गुणपत्रक वितरण सुरू झाले आहे. पुढील शैक्षणिक वर्षाच्या प्रवेशासाठी कागदपत्रांची जुळवाजुळव करण्यात विद्यार्थी, पालकांची धावपळ सुरू झाली आहे. बहुतांश महाविद्यालयांनी प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचे ऑनलाईन रजिस्ट्रेशन सुरू केले आहे. यासाठी ऑनलाईनची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. परंतु, शहरातील काही महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयात येण्यास सांगितले आहे. आजपासून (दि. १) द्वितीय व तृतीय वर्षाचे ऑनलाईन वर्ग सुरू होणार आहेत.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी वरिष्ठ महाविद्यालयातील प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. प्रथम वर्षाकरिता ज्या महाविद्यालयांमध्ये सोयीसुविधा उपलब्ध आहेत, अशा महाविद्यालयांनी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबवायची आहे. ज्या महाविद्यालयात ऑनलाईन सुविधा नाही, अशा महाविद्यालयांनी शासनाकडून प्राप्त सूचनेनुसार व सोशल डिस्टन्सिंगचे नियम, मास्क, सॅनिटायझरचा अवलंब करून ऑफलाईन प्रवेश प्रक्रिया राबवावी. प्रवेश देताना विद्यार्थ्यांकडून अँटी रॅगिंगबाबतचा फॉर्म भरून घेणे आवश्यक आहे, अशा सूचना संलग्नता विभागाचे उपकुलसचिव व्ही. एस. सोयम यांनी परिपत्रकात केल्या आहेत.

लोकमत

# नवीन शैक्षणिक धोरण : नवी पहाट

**शिक्षण** क्षेत्रातील सर्वच मंडळी गेली काही वर्षे नवीन शैक्षणिक धोरणाबाबत चर्चा करीत होती. या धोरणाची प्रतीक्षा करीत असतानाच हे नवीन शैक्षणिक धोरण जाहीर झाले आहे. ही स्वागतार्ह बाब आहे. यापूर्वी ठळक लक्षात राहावीत अशी काही धोरणे, कमिशन अहवाल प्रसिद्ध झाले, राबविले गेले. त्यात नवीन शैक्षणिक धोरण १९८६ त्यापूर्वीचा कोठारी कमिशनचा अहवाल, नंतर यशपाल समितीचा अहवाल, सॅम पित्रोदा यांनी प्रसिद्ध केलेला नॅशनल नॉलेज कमिशन यांचा उल्लेख करता येईल. या पार्श्वभूमीवर नवीन शैक्षणिक धोरण २०२० जाहीर होत आहे. या धोरणाची बरीच ठळक वैशिष्ट्ये सांगता येतील, पण त्यातील सर्वांत महत्त्वाचे म्हणजे हे धोरण सर्वसमावेशक धोरण आहे. पूर्वप्राथमिक शिक्षणापासून प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण, उच्च माध्यमिक शिक्षण, पदवीपूर्व शिक्षण, पदव्युत्तर शिक्षण, शिक्षक प्रशिक्षण, व्यावसायिक शिक्षण, भाषा शिक्षण, अशा सर्वच टप्प्यांचा आणि क्षेत्रांचा सखोल विचार करणारे हे धोरण आहे.

पूर्वप्राथमिक शिक्षण, बालशिक्षण या धोरणाच्या कक्षेत येणे ही लक्षणीय आणि स्तुत्य बाब आहे. या मूलभूत पायाचा विचार आजवर धोरणांतून गांभीर्याने झालेला नाही. पूर्वीच्या बऱ्याच चौकटी मोडून आशादायी असे हे धोरण वाटते. खास करून शालेय शिक्षण आणि उच्चशिक्षण यामध्ये आमूलाग्र बदलाच्या भविष्यदर्शी तरतुदी केल्या आहेत. या लेखात यामधील उच्चशिक्षणाविषयीच्या काही बाबींचा ऊहापोह करण्याचा हेतू आहे.

आजवर उच्चशिक्षणरुपी महाकाय गजराज, अनेक नियामक मंडळे वेगवेगळ्या शिक्षणासाठी संसदेत कायदे मंजूर केलेल्या, नियमन करणाऱ्या संस्था, विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी), अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (एआयसीटीई), बार कौन्सिल ऑफ इंडिया (बीसीआय), कौन्सिल ऑफ आर्किटेक्चर (सीओए), फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया (पीसीआय), मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया (एमसीआय) यांच्या साखळदंडांनी बांधून ठेवला आहे. शेकडो विद्यापीठे आणि हजारो महाविद्यालये एवढा व्याप. त्यासाठी तोकडे निधी म्हणजे गजराजाच्या तोंडात त्याची भूक भागेल असे काहीच नाही अशी स्थिती होती आणि आहे.



## शैक्षणिक धोरण २०२०



डॉ. बी. एम. हिर्डेकर
माजी परीक्षा नियंत्रक,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**केंद्र सरकारने तब्बल चौतीस वर्षांनंतर नवे शैक्षणिक धोरण जाहीर केले आहे. भावी पिढी घडविणारे ज्ञान मिळविण्यासाठी प्रत्येकजण धडपडत असतो. त्याला नव्या तंत्रज्ञानाची जोड मिळाल्याने ज्ञानाचेही जागतिकीकरण झाले आहे. अशा पार्श्वभूमीवर भारताची आगामी शैक्षणिक वाटचाल स्पष्ट करणारे हे नवे धोरण समजून घेणे महत्त्वाचे आहे. त्याचाच भाग म्हणून 'लोकमत' पुढील काही दिवस या धोरणाचा आशय तज्ज्ञांच्या सिद्धहस्त लेखनाद्वारे आपल्या वाचकांना देत राहणार आहे.**

हे धोरण २०३० चा शाश्वत विकासाचा जो अजेंडा आहे त्याला अनुसरुन आखले आहे. भारत ज्ञानाधिष्ठित समाज आणि अर्थव्यवस्था व्हावा म्हणून हे धोरण सर्वंकष लवचिक आणि २१व्या शतकाच्या गरजांशी सुसंगत बहुशास्त्रीय बनविले आहे. विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या विशिष्ट क्षमतांचा विकास यामध्ये अपेक्षित आहे. उच्चशिक्षणातील विद्यार्थिसंख्या, त्याचे प्रमाण म्हणजे ज्याला एकूण नोंदणी प्रमाण (जीईआर) म्हटले जाते ते सद्य:स्थितीत २५ ते ३० टक्क्यांवर (शाखानिहाय कमी-जास्त) आहे, ते २०३५ पर्यंत ५० टक्क्यांवर नेण्याचे उद्दिष्ट आहे. अर्थात यासाठी काही उदार धोरणे स्वीकारुन राज्यांनाही विश्वासात घ्यावे लागेल. सध्या पदवीपर्यंतचे विविध ज्ञानशाखांतील शिक्षण एकसुरी, एकांगी झालेले आहे. त्याचे काही तोटे दिसू लागले आहेत. त्यामुळे पदवी स्तरावर आता विद्यार्थ्याला परिपूर्ण (समग्र) म्हणजे शास्त्र, कला, मानव्यविद्या, गणित एकाचवेळी शिकता येतील यासाठी व्यावसायिक शिक्षण व इतर शाखांचे नावीन्यपूर्ण एकात्मीकरण केले जाईल.

पदवी शिक्षणाचा कालावधी ३ किंवा ४ वर्षांचा असेल. यामध्ये प्रथम वर्षानंतर प्रमाणपत्र, दुसऱ्या वर्षानंतर पदविका आणि तीन वर्षांनंतर पदवी देण्याची योजना आहे. ही नवीन योजना आहे. सध्या पदवीपर्यंतचे शिक्षण नोकरी-धंद्यासाठी कुचकामी ठरले आहे. पुढील शिक्षणासाठी पात्रता परीक्षा आणि विविध स्पर्धा परीक्षांसाठीची पात्रता परीक्षा एवढाच दर्जा या पदव्यांना दिसतो आहे. नव्या तरतुदीमुळे विद्यार्थ्याला हव्या त्या वर्षातून बाहेर पडून काही काम, नोकऱ्या करता येतील. रोजगाराची कौशल्ये प्राप्त करता येतील. उमेदीचा काळ प्रत्यक्ष कामात घालविता येईल. भारतासारख्या अनेक प्रश्नांनी ग्रस्त असलेल्या देशात तरुणांच्या हाताला काम द्यायला हवे. त्यांचा उत्पादक काल उच्चशिक्षणासाठी व्यतीत करणे त्याला आणि देशालाही परवडणारे नाही. यासाठी काही 'आदर्श सार्वजनिक विद्यापीठे' आणि 'संशोधन विद्यापीठे' कार्य करतील. सध्या देशात ९००च्या दरम्यान असलेल्या विद्यापीठांतील कोणती विद्यापीठे कशाप्रकारे मॉडेल विद्यापीठे करायची हे स्पष्ट करणे गरजेचे आहे. अनेक राज्यांतील बहुतांश विद्यापीठे (अपवाद वगळता) संलग्नित विद्यापीठांचा भार व परीक्षेच्या ओझ्याखाली दबून त्रस्त आणि सुस्त झाली आहेत. समाजातील एससी, एसटी, ओबीसी या वंचित वर्गातील आणि दिव्यांग, आर्थिक मागास विद्यार्थ्यांना गुणवत्तेवर आधारित प्रोत्साहनपर आर्थिक सवलती शिष्यवृत्ती दिल्या जातील. खासगी विद्यापीठे अशा विद्यार्थ्यांना फी सवलती देतील. उच्चशिक्षण घेणाऱ्या मुलांचे एकूण नोंदणी प्रमाण (जीईआर) ५० टक्क्यांवर नेण्यासाठी दूर शिक्षणाचा विस्तार केला जाईल. याबाबत सध्या अस्तित्वात असलेल्या मुक्त विद्यापीठांचे अभ्यासक्रम, व्यवस्थापन आणि पदव्या कशाही प्रदान करणे याबाबत शोचनीय स्थिती आहे. त्याबाबत न्यायालयांनीही गंभीर आक्षेप नोंदवले आहेत, हे सर्व लक्षात घ्यावे लागेल.

उच्चशिक्षणातील स्वायत्ततेबाबत खूप वादविवाद सध्या सुरु आहेत. या पार्श्वभूमीवर हे धोरण प्राध्यापकांची आणि उच्चशिक्षण देणाऱ्या संस्थांची स्वायत्तता याबद्दल आग्रही आहे. प्रत्यक्षात विद्यापीठ अनुदान आयोगाने यापूर्वी महाविद्यालयांना स्वायत्तता देण्याबाबत सकारात्मक धोरण कृतिशीलपणे स्वीकारले आहे, पण राज्य शासन संचलित विद्यापीठे आणि त्यामधील अधिकारी यांबाबत उदासीन आहेत. स्वायत्ततेसाठी अर्ज केल्यापासून ती मिळेपर्यंत प्राचार्य, संस्थाचालक यांना एवढ्या दिव्यातून जावे लागते की, तुमची नियमित संलग्नित महाविद्यालयाची गुलामी परवडली, पण स्वायत्तता नको. तुम्ही स्वायत्त आहात, पण तरीही आमची परवानगी हवीच असे अधीक्षक, सहा. कुलसचिव, उपकुलसचिव दर्जाचा अधिकारी बजावतो. पुन्हा शासन दरबारी सचिव, उपसचिव यांचे आदेश मान्यता वेगळ्या. यासंदर्भात संबंधितांचे प्रबोधन आणि मनुष्यबळ विकास मंत्रालय (एमएचआरडी) किंवा नवीन शिक्षण मंत्रालयाचे स्पष्ट नियमावलीवजा आदेश आवश्यक आहेत. सर्व ज्ञानशाखांच्या अभ्यासक्रमांची पुनर्रचना, अध्ययन, अध्यापन पद्धती, मूल्यमापन पद्धती आणि विद्यार्थी सुविधा यांमध्ये मोठे बदल करण्याचे संकेत आहेत.

'नॅशनल रिसर्च फौंडेशन' या नव्या संस्थेची स्थापना करून उत्तमोत्तम संशोधन करणाऱ्या विद्यापीठांना आणि महाविद्यालयांना संशोधनासाठी निधी पुरविण्याचे काम यामधून होणार आहे. सध्या संशोधन आणि इतर कामासाठी केंद्र सरकारचा जो निधी आहे, त्यामध्ये केंद्र सरकार संचलित केंद्रीय विद्यापीठे, आयआयटी हे मोठे लाभार्थी आहेत. त्यानंतर राज्यातील विद्यापीठांचा नंबर आणि नगण्य निधी महाविद्यालयांना मिळतो. या निधी वाटपाचे अनेक निकष आहेत. या निधी वाटपाच्या अनेक निकषांवर सुसूत्रीकरण आणि युक्तिवाद करणे अत्यावश्यक आहे. महाविद्यालये सक्षमीकरणासाठी खरे तर स्वतंत्र निधीची आवश्यकता आहे. स्टाफच्या पगाराव्यतिरिक्त सध्या महाविद्यालयांना कोणताही निधी मिळत नाही आणि हीच महाविद्यालये जनसामान्यांच्या शिक्षणासाठी वर्षानुवर्षे कार्यरत आहेत आणि 'जीईआर'मध्ये दरवर्षी टक्का वाढवित आहेत. निधी वाटपातील भेदाभेदाची नीती बदलणे गरजेचे आहे.

# स्टार्ट-अपची संधी; परदेशात मागणी

## अश्विनीचा 'हर्बल ग्रीन टी'जाणार पोर्तुगाल, युगांडात

**काही सुखद...**

**संदीप खांडेकर :** सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ३१ : महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण होताच उद्योजक होण्याची संधी मिळाली तर?, त्यातही प्रॉडक्टला परदेशातून मागणी आली तर? ही किमया घडवली आहे, कोल्हापूरच्या अश्विनी अधिकराव जाधव हिने. तिच्या 'हर्बल ग्रीन टी'ला पोर्तुगाल व युगांडातून मागणी आली आहे. विशेष म्हणजे अखिल भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या स्टार्ट-अप अंतर्गत तिला १२ लाखांचे अनुदान मंजूर झाले आहे.**

परिषदेने स्टार्ट-अपसाठी सेंट्रल इन्स्टिट्यूट रिसर्च फॉर कॉटन टेक्नॉलॉजीला नोडल संस्था म्हणून नियुक्त केले होते.

या टेक्नॉलॉजीतर्फे विद्यार्थी, उद्योजकांकडून स्टार्ट-अपसाठी 'नावीन्यपूर्ण संकल्पना, संशोधन प्रकल्पांतर्गत देशभरातून अर्ज मागवले होते. तिच्या हर्बल ग्रीन टी या इनोव्हेटिव्ह प्रॉडक्टची माहिती अर्जात दिली होती. तिच्या प्रॉडक्टचे



हर्बल ग्रीन टी तयार करताना अश्विनी जाधव.

सिलेक्शन झाले. त्याचे सादरीकरण मुंबईत झाले. प्राथमिक टप्प्यातील प्रॉडक्टची माहिती घेतल्यानंतर पुन्हा तिला मेलवरून मुंबईला येण्याचा निरोप पाठविला. सेंट्रल इन्स्टिट्यूट रिसर्च फॉर कॉटन टेक्नॉलॉजीचे संचालक पी. जी. पाटील यांच्यासह तज्ज्ञांसमोर तिने पुन्हा सादरीकरण केले. मुंबईत चार वेळा सादरीकरण झाल्यानंतर दिल्लीच्या कार्यशाळेतही प्रॉडक्टचे सादरीकरण झाले.

हैदराबादला अंतिम सादरीकरण मार्चमध्ये होणार होते. कोरोनामुळे ते प्रलंबित राहिले होते. अखेर विलंब होत असल्याने मुंबईला जून, तर हैदराबादला जुलैमध्ये अंतिम सादरीकरण झाले. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञांचा त्यात समावेश होता. प्रॉडक्टला मार्केट कसे उपलब्ध होईल?, त्याचा समाजासाठी कसा उपयोग होईल, याची तिने माहिती दिली. परिषदेने तिच्या प्रॉडक्टचे शंभर बॉक्स मागवून घेतले. विशेष म्हणजे स्टार्ट-अपसाठी तिची निवडही झाली. तिच्या प्रॉडक्टसला परिषदेकडून ब्रँडिंग, तर महाराष्ट्र राज्य अन्न व औषध प्रशासनाकडून मान्यता मिळाली.

**'हर्बल ग्रीन टी'ची वैशिष्ट्ये**

- रक्तातील साखरेचे प्रमाण कमी करतो
- रक्तदाब कमी करतो
- रोगप्रतिकारकशक्ती उपयुक्त
- रक्तातील चरबी कमी करतो
- खनिजे, जीवनसत्वे, कॅल्शियमचेही प्रमाण



### देशभरातून निवडलेल्या प्रकल्पांत समावेश

स्टार्टअप अंतर्गत देशभरातून १४ प्रकल्पांची निवड करण्यात आली आहे. त्यात तिच्या प्रकल्पाचा समावेश आहे. तिने सायबरमधून बी. टेक. फूड टेक्नॉलॉजी, तर शिवाजी विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीमधून एम. एस्सी. फूड टेक्नॉलॉजीचा अभ्यासक्रम पूर्ण केला. आविष्कार संशोधन स्पर्धेत तिने राज्यस्तरावर द्वितीय क्रमांकही मिळवला आहे. पदव्युत्तर शिक्षणानंतर तिने म्हैसूरमधील केंद्रीय अन्न व प्रक्रिया संशोधन संस्थेतील स्पाईस अँड फ्लेवर डिपार्टमेंटचे प्रमुख डॉ. बी. बी. बोरसे यांच्या मार्गदर्शनाखाली संशोधन केले. त्यानंतर 'हर्बल ग्रीन टी'चा फॉर्म्युला तयार केला. तिला फूड टेक्नॉलॉजीचे प्रमुख डॉ. ए. के. साहू यांचे मार्गदर्शन मिळाले.

### ग्रीन टी'मध्ये तुतीची पाने

'हर्बल ग्रीन टी'मध्ये तुतीची पाने वापरली जातात. गवती चहा, तुळस व आल्ले यांचा फ्लेवर दिला जातो. अश्विनीने विशेष फॉर्म्युला तयार केला आहे. त्यासाठी तिने पाच ते सहा वर्षे परिश्रम घेतले आहेत. प्रायोगिक तत्त्वावर उत्पादन सुरू असतानाच, तिच्या हर्बल ग्रीन टीला परदेशातून मागणी आली आहे.

# ... तर शिक्षक, कर्मचाऱ्यांची शिवाजी विद्यापीठातच निवास व्यवस्था होणार

## विद्यापीठ व्यवस्थापनाची मान्यता : रिकामी वसतिगृह देणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोनाच्या पार्श्वभूमीवर गरज पडल्यास शिवाजी विद्यापीठातील अधिकारी, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांची विद्यापीठातच निवास व्यवस्था केली जाणार आहे. त्याला विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेने शुक्रवारी मान्यता दिली.

विद्यापीठाने तीन वसतिगृहे जिल्हा प्रशासनाच्या ताब्यात दिली आहेत. त्या ठिकाणी प्रशासनाने नागरिकांच्या संस्थात्मक अलगीकरणाची सुविधा आणि लक्षणे असणाऱ्यांसाठी कोविड केअर सेंटर सुरु केले आहे. सध्या कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने शहरातील शासकीय आणि खासगी रुग्णालयांमध्ये बेडची कमतरता भासत आहे. त्या पार्श्वभूमीवर विद्यापीठातील कोणी अधिकारी, शिक्षक अथवा कर्मचारी हा कोरोनाबाधित झाल्यास त्यांच्या निवासाची व्यवस्था विद्यापीठातील रिकाम्या निवासस्थानांमध्ये करावी, अशी मागणी कर्मचाऱ्यांनी केली होती. त्याबाबत शुक्रवारी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत चर्चा करण्यात आली.

त्यात विद्यापीठातील रिकामी निवासस्थाने, संशोधक विद्यार्थ्यांचे वसतिगृह उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली.

### रुग्णवाहिका उपलब्ध व्हावी

विद्यापीठातील कार्यरत शिक्षक, कर्मचारी अथवा विद्यार्थी यांना अचानकपणे काही शारीरिक समस्या उद्भवल्यास त्यांना विद्यापीठातून दवाखान्यात नेण्यासाठी वाहन उपलब्ध होत नाही.

ते लक्षात घेऊन आरोग्यकेंद्रात रुग्णवाहिका कायमस्वरुपी उपलब्ध व्हावी, अशी मागणी काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी केली. त्याबाबतचे निवेदन कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांना उपकुलसचिव डॉ. व्ही. एस. सोयम, नीलेश बनसोडे, आदींनी दिले.

### परिपत्रकाबाबत नाराजी

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना म्हणून घ्यावयाच्या दक्षतेबाबतचे परिपत्रक विद्यापीठ प्रशासनाने शुक्रवारी काढले आहे. त्यात एखादा शिक्षक, अधिकारी, प्रशासकीय सेवक यांना प्रादुर्भावाची लक्षणे आढळल्यास काळजी घेण्याचे आवाहन केले. मात्र, त्यातील शासकीय अथवा शासनमान्य रुग्णालयातून आपल्या स्तरावर तपासणी करून घेणे आणि पुढील कार्यवाही करण्याच्या मुद्द्याबाबत काही कर्मचाऱ्यांनी नाराजी व्यक्त केली.